*** पीक संजीवकाचा वापर :-** शेवग्याच्या झाडाची उंची कमी होऊन विस्तार अधिक होण्यासाठी पावसाळ्यापूर्वी छाटणी करून १००० पी.पी.एम. तीव्रतेचे लिहोसीन अथवा सायकोसिल ड्रेचिंग करावे. तसेच पीक फुलोऱ्यात असताना फुलगळ टाळण्यासाठी व शेंगा लागण्यासाठी एन.ए.ए. १० पी.पी.एम. अधिक झिंक (चिलेटे) २० पी.पी.एम.फवारावे.



*** पीक संरक्षण :- किडी १) पाने खाणारी अळी :-** सुरूवातीस कोवळ्या पानांवर हिची सुरूवात होते नंतर हळूहळू ८ ते १० दिवसात संपूर्ण पाने, कोवळे शेंडे व झाडाची कोवळी साल खाऊन फस्त करते. ही अळी भयंकर खादाड असल्याने थोड्याच दिवसात संपूर्ण झाडाचे १००% नुकसान करते. झाडावर पाने, कोवळ्या शेंगा, कळी यापैकी काही शिल्लक ठेवत नाही. या अळीच्या तोंडातून कोळ्याच्या जाळीसारख्या तारा निघत असल्याने पानांवर जाळी तयार झाल्यासारखी दिसते.

उपाययोजना :-लॅम्डा सायलोथ्रिन/मोनो फोटोफॉस – १.५ मिली / लिटर
बायो ३०३/झेन १०१ – ०.५ मिली / लिटर

यापैकी कोणतेही एक औषध दर ८ ते १० दिवसानी आलटून पालटून फवारावे.



**२) फळमाशी :-** ही माशी कोवळ्या व तयार शेंगावर अंडी सोडते. ३ ते ४ दिवसात अंड्यातून अळ्या बाहेर पडतात. अळ्या शेंगात शिरून आतिल गर खातात त्यामुळे शेंगातून डिंग किंवा फेस बाहेर येतो. बरेच शेतकरी त्यामुळे यास डिंक्या म्हणतात. यामुळे शेंग वाळून जाते किंवा सडते. उपाययोजना :- किटननाशक फवारणी –

| | |
|---|---|
| फेन्थिऑन ८० इसी | – ०.०४% |
| इमानेक्टिन बेन्झोएट ५ एस जी | – ०.२५ ग्रॅम / लिटर |
| स्पिनोसॅड ४५ एस सी | – ०.२. मिली/लिटर |

*** काढणी :-** शेवग्याचे शेंगा जाती नुसार लागवडीनंतर ५ ते ६ महिन्यात तोडायला येतात. व पुढे ३ ते ४ महिन्यात तोडणी चालते. या काळामध्ये कमीतकमी १० किलोपासून २५ ते ३० किलो शेंगा प्रति झाड उत्पन्न मिळते. शेंगा मांसल व मध्यम अवस्थेत तोडाव्यात.

कृषि विज्ञान केंद्राचे मार्गदर्शन घेऊन शेतकऱ्यांनी सुधारीत जातीची लागवड करून प्रति झाड २०० पेक्षा जास्त शेंगाचे उत्पादन घेवून प्रति एकरी ७५,००० रूपयापेक्षा जास्त नफा मिळविला आहे. तरी शेतकऱ्यांनी या पिकाच्या लागवडीकडे वळावे.


संपादक व प्रकाशक
**डॉ. ला. रा. तांबडे**
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख

• संकलक •

**प्रा.वि. भि. भिसे**
विषय विशेषज्ञ (उद्यान विद्या)

**डॉ. ला. रा. तांबडे**
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख

**कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर**



तांत्रिक माहिती स्त्रोत :- महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

प्रकाशन वर्ष : जाने.२०१७ | एकूण घडी पुस्तिका क्र.५२ | एकूण प्रकाशन क्र.६० | प्रति : २००० | एकूण खर्च : रू.४९५०/- कृ.वि.के.सोलापूर


# कमी पाण्यात शाश्वत उत्पादन देणारा : शेवगा








वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
शबरी कृषि प्रतिष्ठान संचलित,

**कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर**

सोलापूर-बार्शी रोड, मु.खेड, पो.केगाव,
ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर (महाराष्ट्र)
फोन : ०२१७-२५००१५३

Visit us at : www.kvksolapur.org

## कमी पाण्यात शाश्वत उत्पादन देणारा : शेवगा



शेवगा हे एक अल्प कालावधीत अल्पखर्चात अत्यल्प पाण्यात निसर्गाशी सुसंवाद ठेवून शाश्वत उत्पादन देणारे भाजीपीक आहे. सोलापूर सारख्या अवर्षण प्रवण भागात हमखास उत्पादन देणारे भरवशाचे पिक म्हणून कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर याचा प्रसार व प्रचार मागील १८ वर्षापासून करत आहे.

शेवगा पानांत 'अ' जीवनसत्व पुरेसे असते. शेवगा पानामध्ये गाजराच्या चारपट जीवनसत्व 'अ', संत्र्याच्या सातपट जीवनसत्व 'क', दुधाच्या चारपट कॅल्शियम व दुप्पट प्रथिने आणि केळीपेक्षा तीन पट पोटॅशियम असते. शेवगा पानाचा रस हे एक अल्प टॉनिक आहे. शेवग्याच्या उकडलेल्या शेंगा अगर शेवगा शेंगाची भाजी यात ॲन्टिबायोटिक्स सारखी प्रतिजैविके असतात. त्यामुळे घसा व त्वचारोग बरे होतात. त्यांच्या सेवनाने रक्ताभिसरण चांगल्या प्रकारे होते.

**शेवगा लागवड ही पुढील काही महत्वाच्या बाबींमुळे खुप मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.**

- शेवगा हे पिक हलक्या माळरान जमीनीत तथा बांधावरीही उत्तम प्रकारे येते.
- कोरडवाहू फळझाडात एक उत्तम आंतरपिक म्हणून शेवगा चांगले उत्पादन देतो.
- निर्यातक्षम पीक म्हणून शेवग्याला व्यापारी दृष्ट्या फार महत्व प्राप्त झाले आहे.
- तुलनेने इतर पिकापेक्षा दर एकरी शेवगा लागवड खर्च अत्यंत कमी आहे.
- एकदा लागवड केल्यानंतर पाच ते सहा वर्षापर्यंत उत्पन्न घेता येतो, त्यामुळे दरवर्षी होणाऱ्या लागवड खर्चात मोठी बचत होते.

*** शेवग्याच्या सुधारीत जाती :-**



**पी.के.एम.-२ :-** शेवगा लागवड केल्यापासून अवघ्या सहा महिन्यात शेंगाचे उत्पादन येते. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनासाठी जास्तकाळ वाट पहावी लागत नाही. शेंगा ६० ते ७५ सें.मी. लांब असून मध्यम जाडीच्या, जास्त गराच्या आणि उत्तम चवीच्या असतात तसेच शेंगा हिरव्या रंगाच्या असून जास्त चमक असलेल्या असतात त्यामुळे ग्राहक जास्त पसंत करते. शेवग्याची लागवड केल्यानंतर ३ ते ४ वर्षापर्यंत झाडे उत्पादन देतात. या जातीच्या झाडामध्ये छाटणी तंत्रज्ञान वापरून दर हेक्टरी झाडांची संख्या वाढविणे शक्य आहे. तसेच या जातीवर रोग, किडींचा विशेष परिणाम जाणवत नाही. कमी पाण्यामध्ये दोन बहारापासून सरासरी ३५०-४०० शेंगा मिळतात.



**के.डी.एम.०१ -भाग्या :-** लवकर ४-५ महिन्यात फळधारणा, हिरव्यागार व आकर्षक शेंगा (६५-७० सें.मी.) फांद्यांचे प्रमाण जास्त व भरपूर उत्पादन देणारी, वर्षाला २००-३०० शेंगा प्रति झाड (२० ते ३० किलो), छाटणीतंत्र वापरून ८ X ८ फूट लागवडीस योग्य. शेवग्याच्या इतर जातीमध्ये कोकम रूचीरा, पीकेएम-१ आदिंचा समावेश होतो.

*** जमिन :-** हलक्या ते मध्यम आणि पाण्याचा योग्य निचरा होणाऱ्या जमिनीत तसेच डोंगर उताराच्या जमिनीत हे पीक चांगले येते. भारी काळ्या जमिनीत शेवग्याची झाडे जोमाने वाढतात, शाखीय वाढ जास्त होते व त्यामुळे अशी झाडे केवळ उंचच उंच वाढतात. परिणामी शेवग्याचे उत्पन्न कमी येते. अशा जमिनीत हे पीक जिरायत म्हणून घ्यावे. चोपण जमिनीत शेवग्याची वाढ चांगली होत नाही. शेवग्यासाठी निवडलेल्या जमिनीचा सामू ६ ते ६.५ च्या दरम्यान असावा.

*** हवामान :-** शेवग्याच्या उत्तम वाढीसाठी सम व दमट हवामान चांगले. तापमान २५ ते ३० डिग्री सें.मध्ये झाडाची वाढ चांगली होते. मात्र तापमान ४० डिग्री से. पेक्षा अधिक असल्यास फुलगळ होते. सर्वसाधारणपणे ७५० ते १००० मी.मी. पर्जन्यमान असलेल्या भागात हे पीक येऊ शकते. हे पीक उष्ण तापमानाला व मोठ्या काळोख्या रात्रीला फार संवेदनशील आहे. फुले येण्याच्या कालावधीमध्ये जर पाऊस असेल तर फुलांचा मोहर गळतो. एकसारखे ढगाळ वातावरण या पिकास हानिकारक असते. त्यामुळे फुलोरा उशिरा येऊन उत्पादनात घट होते.

*** हंगाम व लागवड :-** शेवग्याची लागवड वर्षभर तिनही हंगामामध्ये करता येते. यामध्ये खरिप (जुन-जुलै), रब्बी (सप्टे - ऑक्टों) व उन्हाळी (जाने - फेब्रुवारी) मध्ये लागवड करता येते. यातील प्रत्येक काही लागवडीचे फायदे तोटे आहेत.

*** लागवडीचे अंतर :-** हलक्या ते मध्यम जमिनीमध्ये लागवड अंतर कमी ठेवावे. परंतु भारी जमिनीमध्ये झाडांची वाढ जास्त होत असल्याने अंतर जास्त ठेवावे अन्यथा झाडांची दाटी होऊन फवारणी करणे शेंगा काढणे जिकीरीचे होते.

शेवगा लागवड जर एका वर्षाकरिता करायची असेल तर घन लागवड म्हणजे ६X६ फुट ते ८ X ६ फुट अंतर ठेवावे. अशा लागवडीमध्ये पुढील वर्षी एक आड एक झाड कमी करून दुबार व तिबार पिके घेता येतात. जमिनीच्या प्रकारानुसार शेवगा पिकाचे चांगले उत्पादन घेण्यासाठी ८ X ८ किंवा १० X १० फूट अंतर ठेवून एकरी ६८० ते ४३५ रोपे असणे गरजेचे आहे.

*** वळण व छाटणी :-** शेवग्याचे झाड झपाट्याने वाढणारे असल्यामुळे सहा महिन्यात शेंगा येण्यास सुरुवात होते म्हणून सुरूवातीस वळण देणे गरजेचे आहे. वळण देणे जर व्यवस्थित व वेळीच केले नाही तर झाड उंच वाढून शेंगा काढणे अवघड होईल. यासाठी लागवडीनंतर अडीत ते तीन महिन्यात झाडांची उंची ५ ते ६ फुटांपर्यंत वाढते. अशा वेळी तीन ते चार फुटावर झाडांचा शेंडा खुडावा. त्यामुळे खालच्या बाजूला भरपूर फांद्या येतात. या फांद्या सर्व बाजूंनी राहतील याची काळजी घ्यावी. फांद्याची जोमदार वाढ झाल्याने भरपूर फुले येतात. छाटणी तंत्राअंतर्गत फळ काढणीनंतर शेवग्याचे पाणी देणे काही काळ बंद करावे, नंतर प्रत्येक मुख्य फांदी एक ते दोन फुटावरून करवतीने कापावी (छाटावी) त्यामुळे प्रत्येक फांदीवर अनेक नवीन फांद्या येतात. अशाप्रकारे ओलीताखालच्या शेवगा झाडाची कापणी (छाटणी) शक्यतो एप्रिल महिन्यातच करावी. झाडांवर जेवढ्या फांद्या जास्त तेवढे शेंगाचे उत्पादन जास्त मिळते.



*** एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन :-** शेवग्याच्या पूर्ण वाढलेल्या झाडाला दरवर्षी १० कि. चांगले कुजलेले शेणखत, १०० ग्रॅम युरिया, ४०० ग्रॅम सुपर फॉस्फेट व २०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश ही खते द्यावीत. नवीन लागवड केल्यास बेसल डोस म्हणून दोन महिन्यांनी एकरी ४ ते ५ टन शेणखत जमीनीत मिसळावे. सोबतच एकरी ५ बॅग सुपर फॉस्फेट २ बॅगा म्युरेट ऑफ पोटॅश व सुक्ष्म अन्नद्रव्याचे १ बॅग मिसळून द्यावे. खते टाकून बेड तयार करावेत व नंतर प्रत्येक महिन्याला १०० ते १५० ग्रॅम प्रति झाड १०:२६:२६ हे खत द्यावे.

### फर्टिगेशन पद्धतीने खत व्यवस्थापन

| अवस्था | खते | कालावधी / मात्रा |
| --- | --- | --- |
| फुले लागेपर्यंत | १९:१९:१९ | दर आठवड्यास एकरी ५ कि.प्रमाणे |
| फुले लागल्यानंतर | १२:६१:००<br>१३:००:४५ | आलटून पालटून दर आठवड्यास एकरी ५ कि. |
| शेंगा फुगवणीसाठी | ००:५२:३४<br>००:००:५० | आलटून पालटून दर आठवड्यास एकरी ५ कि. |